

# ‘ती’ची गोष्ट

## मातृत्वाच्या वाटेवरची

# ‘ती’ची गोष्ट

## मातृत्वाच्या वाटेवरची

पहिली आवृत्ती
**नोव्हेंबर, 2025**

संकल्पना
**भाऊसाहेब आहेर**

निर्मिती दिग्दर्शन
**डॉ. धनंजय काकडे**

संपादन व लेखन
**तृप्ती मालती व भाऊसाहेब आहेर**

छायाचित्र
**भूषण माटे**

संकलन निर्मिती साहाय्य
**प्रशांत खुंटे, ज्योती घोगरे, विद्या शिंदे, रमा शेंडगे, उषा पवार, पूजा गायकवाड, वैशाली फाटक, सुधामती काटे, कल्पना शिंदे, रीना शर्मा, रोहिणी गाडे, त्रिवेणी मोरे, दिपाली केदारी**

मुद्रितशोधन
**शारदा महल्ले**

मुखपृष्ठ व कलानिर्देशन
**संदिप साळुंके**

प्रकाशक
**अनुसंधान ट्रस्ट -साथी**

अर्थसाहाय्य
**बजाज फिनसर्व्ह**

खासगी वितरणासाठी

# प्रस्तावना

समाज म्हणून आपल्या विकासाचा दर्जा दोन निकषांवर पाहता येतो – एक मातामृत्यू व दुसरे कुपोषण!

समाज जितका प्रगत तितके मातामृत्यू कमी. 2020 मध्ये दर एक लाख बाळंतपणात जर्मनीत 34, ऑस्ट्रेलियात 9 तर स्विडनमध्ये केवळ 5 मातामृत्यूंची नोंद झालीय. हे प्रगत देश. याउलट भारतात याच काळात मातामृत्यूंची संख्या आहे 23753. अलीकडे मातामृत्यू घटवण्यात आपण बरीच सुधारणा घडवली आहे. पण तरीही अजून बराच पल्ला गाठणं बाकी आहे.

दुर्गम आदिवासी इलाख्यात या प्रश्नांची तीव्रता जास्त जाणवते. शहरी भागात वैद्यकीय सेवांची उपलब्धता अधिक. परिणामी मातामृत्यू व कुपोषणावर मात करणंही सोपं व्हायला हवं. पण वास्तव विपरीत दिसतं. विशेषत: नागर वस्त्यांमधील गरीब लोकसंख्येत आरोग्यसेवा सहज उपलब्ध असल्या तरी त्या मिळवण्यासाठी मोजावे लागणारे पैसे खूप जास्त आहेत, शिवाय पाणी, स्वच्छता, सांडपाणी व कचरा व्यवस्थापन अशा अनेक समस्या नागरी वस्त्यांमध्ये अजूनही ‘आ’ वासून उभ्या आहेत.

‘साथी’ संस्थेमार्फत ‘माता आणि बाल आरोग्य व पोषण सुधार’ या प्रकल्पातून कुपोषण व मातामृत्यूंचा सामना केला गेलाय. योग्य व सुसंगत प्रयत्नांतून मातृत्व सेवा सहज आणि मोफत उपलब्ध व्हाव्यात व कुपोषणाला आळा घालण्याचा निश्चित प्रयत्न केलाय. या सगळ्या प्रवासात साथीदार असलेल्या महिलांचे छायाचित्रण आपणासमोर ठेवत आहोत. आपल्या सहानुभूतीपूर्वक प्रतिसादासाठी !

या छायाचित्रातून आपणाला दिसेल, कठीण परिस्थितीवर मात करण्याची नागरवस्त्यांची उमेद, जगण्याची जिद्द नि 'साथी' संस्थेचा कुपोषण व मातृत्व सेवा सुधारण्याच्या प्रयत्नांचा आलेख.

**डॉ. धनजंय काकडे**
संचालक, अनुसंधान ट्रस्ट -साथी, पुणे.



# भाग्यश्री क्षीरसागर

मी गृहिणी आहे. माझे पती कांदे-बटाट्यांचे छोटे विक्रेते आहेत. गरोदरपणात मी पंढरपूरहून पुण्यातल्या वस्तीत राहायला आले. तेव्हा इथल्या महापालिकेच्या दवाखान्यांविषयी मला काहीच माहिती नव्हती. सगळं नवंच होतं-शहर, लोक आणि आरोग्यसेवा.

तेव्हाच आमच्या वस्तीतल्या आरोग्यसाथी रमाताईंनी माझं नाव दवाखान्यात नोंदवलं, तपासणीसाठी नेलं आणि माझं गरोदरपण सुरक्षित पार पडावं म्हणून प्रत्येक टप्प्यावर साथ दिली. महानगरपालिकेच्या पृथक बराटे दवाखान्यात मला मोफत सोनोग्राफी आणि इतर उपचार मिळाले. तपासणीत माझं रक्त (हिमोग्लोबिन 6.1) खूप कमी असल्याचं समजलं. रमाताईंनी संयमाने समजावलं की हे धोक्याचं आहे. त्यांच्या सल्ल्यानुसार मी आहारात बदल केला आणि त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार मी रक्तवाढीसाठी पाच इंजेक्शन घेतली, त्यांनतर माझं हिमोग्लोबिन 12.3 वर पोहोचलं.

माझं सीझेरियन कमला नेहरू दवाखान्यात झालं. माझा मुलगा अनिकेत जन्मल्यानंतर दीड दिवस काचेच्या पेटीत होता, पण त्याची तब्येत आता चांगली आहे. या संपूर्ण उपचार प्रक्रियेत आम्ही जवळपास 60 ते 70 हजार रुपये वाचवले.

आज माझी आणि अनिकेतची तब्येत चांगली आहे. या प्रवासात मला समजलं की योग्य मार्गदर्शन आणि सार्वजनिक आरोग्यव्यवस्था— उपलब्ध असेल तर आई होणं हा भीतीचा नाही, आनंदाचा अनुभव असू शकतो.

**भाग्यश्री क्षीरसागर**
**अनिकेत क्षीरसागर**



# पूजा काकडे

माझे मिस्टर बांधकामावर बिगारी काम करतात. आर्थिक चणचण असल्यामुळे घर चालवणं तसं कठीणच होतं — माहेरचा विशेष आधार नव्हता आणि त्यामुळे माझं गरोदरपण खूपच अडचणीत गेलं.

तेव्हाच आमच्या वस्तीतल्या आरोग्यसाथी उषाताईंनी मला खूप मदत केली. त्यांनी मला सांगितलं की, 'महापालिकेच्या दवाखान्यात नावनोंदणी करणं किती महत्त्वाचं आहे' आणि त्यासाठी स्वतः माझ्यासोबत आल्या. गरोदरपणातील सर्व तपासण्या मी पृथक बराटे या महापालिकेच्या दवाखान्यात केल्या. सोनोग्राफीसुद्धा तिथेच मोफत झाली. प्रत्येक भेटीत उषाताई माझ्यासोबत होत्या—कधी समजावून सांगायला, कधी धीर द्यायला.

माझं बाळंतपण कमला नेहरू रुग्णालयात सुरक्षितपणे झालं. जर ही सरकारी सेवा आणि उषाताईंचं मार्गदर्शन मिळालं नसतं, तर कदाचित मला कर्ज घ्यावं लागलं असतं. या सर्व उपचारांमुळे आमचा सुमारे सत्तर हजार रुपयांचा खर्च वाचला.

आज माझी मुलगी निरोगी आहे आणि मीही हळूहळू सावरतेय. या अनुभवातून मला जाणवलं—जेव्हा कोणीतरी वेळेवर साथ देतं, तेव्हा कठीणातला कठीण काळही पार करता येतो.

**पूजा काकडे**
**मायरा काकडे**



# सना **शेख**

आमचा गोधडी शिवण्याचा छोटा व्यवसाय आहे. सासूबाई आणि सासरे दोघंही शिवणकाम करतात आणि माझे पती मजुरीवर जातात. घरात सगळेच कष्ट करणारे- पण उत्पन्न मर्यादितच. गरोदरपणात जस-जसे दिवस पुढे जात होते, तशी माझी तब्येत बिघडू लागली. बाळाचं वजन जास्त असल्याने माझ्या पायावर सतत सूज यायची. चालणं, बसणं सगळंच अवघड झालं होतं.

आरोग्यसाथी रमाताई मला पृथक बराटे दवाखान्यात घेऊन गेल्या. आणि नावनोंदणी करून दिली. पुढील सगळ्या तपासण्या व उपचार सुतार दवाखान्यात झाले. डॉक्टरांनी सांगितलं की, 'प्रसूती सीझेरियननेच होईल'. भीती वाटत होती, पण रमाताई सतत माझ्यासोबत होत्या.

शेवटी माझं बाळंतपण कमला नेहरू रुग्णालयात झालं. त्या वेळी मला खूप रक्तस्त्राव झाला आणि रक्त चढवावं लागलं. पण संपूर्ण उपचार मोफत झाले — एक पैसाही खर्च आला नाही.

आज माझं बाळ निरोगी आहे. मागे वळून पाहते तेव्हा वाटतं, सरकारी दवाखान्यांची ही मदत आणि रमाताईंचं मार्गदर्शन नसतं, तर हा प्रवास इतका सुरक्षित आणि सुलभ झाला नसता.

**सना शेख**
**खालिद शेख**



# गीता मिसाळ

मी वस्तीत राहते आणि माझे मिस्टर पोल्ट्रीच्या गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करतात. आधी माझं आयुष्य घरापुरतंच मर्यादित होतं—स्वयंपाक, मुलं आणि रोजची धावपळ. पण मनात नेहमी एक इच्छा होती—आपल्या वस्तीतल्या लोकांसाठी काहीतरी करावं, उपयोगी पडावं.

तरीही, भीती वाटायची. कारण कधीही घराबाहेर पडून काही केलं नव्हतं. वाटायचं—आपल्याला जमेल का हे सगळं?

तेव्हाच साथी संस्थेच्या आरोग्यसाथी उषाताईंनी मला प्रोत्साहन दिलं. त्यांनी माझं म्हणणं ऐकलं आणि एके दिवशी त्यांनी विचारलं, "महिला आरोग्य समितीचं अध्यक्ष म्हणून काम कराल का?" आधी थोडा संकोच वाटला, पण मग मनाशी ठरवलं—एकदा प्रयत्न करून बघूया.

तेव्हापासून माझा प्रवास सुरू झाला. आज मी आमच्या वस्तीतल्या महिला आरोग्य समितीची अध्यक्ष आहे. या समितीच्या माध्यमातून आम्ही वस्तीतील महिलांचे आणि कुटुंबांचे प्रश्न सोडवतो—कधी दवाखान्यांशी संपर्क, कधी पाण्याची तक्रार, कधी स्वच्छतेचा मुद्दा. लोक माझ्याकडे विश्वासाने येतात आणि त्यांचं ऐकून घेता येतं, हे समाधान आहे.

घरातून बाहेर पडायची भीती आता मागे पडली आहे. आज मला वाटतं—जेव्हा आपण इतरांसाठी काही करतो, तेव्हा आपलं स्वतःचं आयुष्यही बदलतं.

**गीता मिसाळ**

अध्यक्ष, महिला आरोग्य समिती,
वारजे



# पूजा कांबळे

“

माझी मुलं लहान असल्यामुळे मी घरीच असते. सासूबाईंचा खूप पाठिंबा आहे. त्या भंगार गोळा करून विकतात आणि त्यांच्याच उत्पन्नावर आमचा उदरनिर्वाह चालवतो.

माझ्या बाळाचा जन्म झाला त्यावेळी त्याच्या जिभेजवळच्या टाळूला छिद्र होतं, ओठ दुभंगलेले होते आणि उजवीकडचा ओठ पूर्णपणे उघडा होता. आणि त्याला काहीच खाता-पिता येत नव्हतं. आम्ही त्याला चमच्याने दूध द्यायचो, पण तेही घशात ओतल्यावरच तो पिऊ शकायचा. हे सगळं बघून मला खूप वाईट वाटायचं.

गरोदरपणात पूजाताईंच्या मदतीमुळे माझे सर्व उपचार व बाळंतपण सरकारी दवाखान्यात मोफत झाले. बाळाची समस्या पाहून उषाताईंनी औंध रुग्णालयात जायला सांगितलं. तिथे बाळाची तीन ऑपरेशन्स् मोफत झाली. त्यामुळे आता तो पूर्वीपेक्षा खूप चांगला दिसतो आहे. अजून एक ऑपरेशन बाकी आहे, जे तो दहा वर्षांचा झाल्यावर करू या असं डॉक्टरांनी सांगितलंय.

या सर्व उपचारांमुळे माझा मुलगा आता खूपच बरा आहे आणि तो व्यवस्थित खाऊ-पिऊ शकतो. त्याच्याकडे बघितलं की समाधान वाटतं.

**पूजा कांबळे**
**समर्थ कांबळे**



# वैभवी माचेकर

मी कामना वसाहतीत राहते. आमचं कुटुंब फुलं आणि हार बनवण्याचा छोटा व्यवसाय करतं—तोच आमच्या जगण्याचा आधार आहे.

माझ्या दुसऱ्या गरोदरपणाच्या वेळी आरोग्यसाथी वैशालीताई माझ्या आयुष्यात आल्या. त्यांनी मला स्वतःची काळजी कशी घ्यावी, काय खावं-प्यावं आणि गरोदरपणात कोणत्या गोष्टी टाळाव्यात याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केलं. गरोदरपणात माझं वजन कमी असल्याने बाळाचं वजनही कमी होतं. वैशालीताई मला नेहमी सांगायच्या, “थोडं जास्त खा, विश्रांती घ्या आणि स्वतःकडे लक्ष द्या.” त्यांच्या सल्ल्यामुळे माझं बाळंतपण सुरक्षितपणे पार पडलं. माझी सर्व तपासणी आणि उपचार विजयाबाई शिर्के दवाखान्यात मोफत झाले.

माझ्या पहिल्या बाळाचं वजनही कमी होतं. वैशालीताईंनी ते ओळखलं आणि त्या दर महिन्याला माझ्या मुलाचं वजन तपासायच्या. त्यांनी मला सांगितलं की घरात ‘बाळकोपरा’ तयार करा—बाळाला सुरक्षित, स्वच्छ आणि उबदार ठेवत चला. मी तसं केलं आणि हळूहळू माझ्या बाळाचं वजन वाढू लागलं.

आज माझा मुलगा निरोगी आहे. प्रत्येक वेळी त्याला हसताना पाहते, तेव्हा वैशालीताईंचं मार्गदर्शन आठवतं.

**वैभवी माचेकर**
**शंभू माचेकर**



# विद्या फडतरे

मूलं लहान असल्यामुळे मी घरी असते. माझे मिस्टर एका कंपनीत हेल्पर म्हणून काम करतात. गरोदरपणात मी सर्व तपासण्या आणि उपचार महापालिकेच्या दवाखान्यातच केले. डॉक्टर नेहमी म्हणायचे की, 'सर्व काही नीट आहे', पण आठव्या महिन्यात अचानक बाळाचे ठोके कमी जाणवायला लागले. घाबरून आम्ही कमला नेहरू रुग्णालयात गेलो. डॉक्टरांनी सांगितले की, "परिस्थिती थोडी गंभीर आहे" आणि मला ताबडतोब ॲडमिट करण्यात आले. आठ दिवस मी तिथेच होते.

डॉक्टरांनी सांगितलं होतं, “बाळ जन्मल्यानंतर त्याला लगेच एनआयसीयू मध्ये ठेवावं लागेल”. पण दुर्दैवाने कमला नेहरूमध्ये एनआयसीयू बेड उपलब्ध नव्हता. त्यामुळे आम्हाला ससून रुग्णालयात पाठवलं. तिथे माझं बाळंतपण सुरक्षितपणे झालं—आणि सगळ्यांत महत्त्वाचं म्हणजे बाळाला एनआयसीयू ची गरजच पडली नाही.

माझ्या गरोदरपण-बाळंतपणाच्या काळात आरोग्यसाठी पूजाताईंनी मला सतत मार्गदर्शन केलं—कोणता दवाखाना, कोणती कागदपत्रं, काय करायचं—सगळं त्यांनी सांगितलं. त्यांच्या मदतीमुळे माझं गरोदरपण आणि बाळंतपण दोन्ही सुखरूप पार पडलं. यात आमचे साधारण पन्नास हजार रुपये खर्च झाले असते, पण हे सगळं सरकारी दवाखान्यात झाल्यामुळे एक पैसाही लागला नाही.

आज मी आणि माझा मुलगा सुखरूप आहोत.

**विद्या फडतरे**
**आदिनाथ फडतरे**



# आरती शिंदे

माझं पहिलं बाळंतपण खासगी दवाखान्यात झालं होतं आणि त्यावेळी बराच खर्च आला. माझे मिस्टर ड्रायव्हर म्हणून काम करतात. त्यामुळे विशेष उत्पन्न नाही. दुसऱ्यांदा गरोदर राहिले तेव्हा मनात भीती होती-इतका खर्च पुन्हा कसा भागवायचा?

तेव्हाच साथी संस्थेच्या वैशालीताईंनी मला सांगितलं की, 'गरोदरपणातील सर्व सेवा सरकारी दवाखान्यात मोफत मिळतात.' सुरुवातीला मला विश्वासच बसला नाही. वाटलं, खरंच असं आहे का? पण वैशालीताईंनी संयमाने समजावलं, माझ्या सगळ्या प्रश्नांना उत्तरं दिली आणि सोबत दवाखान्यात नेऊन दाखवलं की सेवा खरोखर उपलब्ध आहेत.

मी विजयाबाई शिर्के दवाखान्यात नोंदणी केली. तिथे मला अतिशय चांगली सेवा मिळाली—सर्व तपासण्या, औषधं आणि सल्ला मोफत होता. बाळंतपणासाठी मी सुतार दवाखान्यात गेले आणि ते सुरक्षितपणे पार पडलं.

या सगळ्या प्रक्रियेत आमच्या कुटुंबाचे पन्नास हजार रुपये तरी वाचले असतील.

आरती शिंदे
शिवांश शिंदे



# मंगला **पवार**

“

माझी मुलगी चार महिन्यांची झाली तेव्हापासून साथी संस्थेच्या रीनाताई माझ्याकडे यायच्या. त्या नेहमी म्हणायच्या, “तुझ्या मुलीचं वजन थोडं कमी आहे, ते वाढवायला लागेल”. त्या तिचं नियमित वजन घ्यायच्या आणि मला सांगायच्या- “काय खायला द्यावं, कोणता आहार योग्य आहे, किती वेळानं खायला द्यायचं.”

त्यावेळी आमचं आयुष्य खूप कठीण होतं. माझे पती सिग्नलवर लिंबू-मिरची विकतात. आमच्याकडे स्वयंपाक करण्याची फारशी सोय नव्हती. त्यामुळे रोजचं अन्नही कधी मिळायचं, कधी नाही. रीनाताईंचं ऐकून मला वाटलं—आपण प्रयत्न केला तर हळूहळू बदल करू शकतो.

मी थोडी-थोडी भांडी घेतली, गॅसची शेगडी घेतली आणि घरी जेवण बनवायला सुरुवात केली. आता आम्ही नियमित घरातच स्वयंपाक करतो. सगळे एकत्र बसून जेवतो. मी मुलीला घरचं, ताजं अन्न खाऊ घालते.

या छोट्या बदलांनी माझ्या मुलीच्या तब्येतीत फरक दिसायला लागला. तिचं वजन हळूहळू वाढत आहे आणि ती आता हसरी, खेळकर झाली आहे.

**मंगला पवार**
**सोनू पवार**



# विद्या खारे

मी संभानगर वस्तीसाठी एएनएम म्हणून काम करते. काही वर्षांपूर्वीपर्यंत ही वस्ती खूप वेगळी होती. लसीकरण, गरोदरपणातील तपासण्या, कुटुंबनियोजन- या सगळ्या गोष्टींबद्दल लोकं फारसं ऐकायला तयार नसत. अनेकदा घराघरात जावं लागायचं, समजावून सांगावं लागायचं, पण प्रतिसाद कमीच मिळायचा.

मग साथी संस्थेचं काम इथे सुरू झालं. गेली तीन वर्षे इथे नियमितपणे बैठका होतात, ते महिलांना आरोग्य, पोषण आणि स्वच्छतेबद्दल समजावतात आणि वेगवेगळ्या विषयांवर नावीन्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करतात. हळूहळू वस्तीतील वातावरण बदलत आहे.

आता महिलाच स्वतःहून दवाखान्यात येतात—गरोदरपणातील तपासणीसाठी, लसीकरणासाठी किंवा सल्ला घ्यायला. बाळांचं लसीकरणही नियमित होतं आणि लोक आरोग्यसेवेचं महत्त्व ओळखायला लागले आहेत.

जेव्हा मी वस्तीमध्ये फिरते आणि त्या महिलांना एकत्र येऊन लसीकरण घेताना पाहते, तेव्हा मनात एकच विचार येतो—बदल हळू होतो, पण तो होत असतो. आणि तो दिसू लागला की आपल्या प्रयत्नांना खरा अर्थ मिळतो.

**विद्या खारे**
एएनएम, विजयाबाई शिर्के दवाखाना



# प्रियांका तांबारे

“

माझा नवरा कंत्राटी पद्धतीने काम करतो, मी घर सांभाळते. आमचं उत्पन्न तसं खूपच मर्यादित आहे. पहिल्या बाळंतपणाच्या वेळी आम्हाला जवळपास पंधरा हजार रुपये खर्च आला होता—तेव्हाच ठरवलं होतं की दुसऱ्यावेळी शक्य तेवढं सरकारी सेवांचा वापर करायचा.

दुसऱ्या गरोदरपणात मी महापालिकेच्या पृथक बराटे दवाखान्यात नावनोंदणी केली. सातव्या महिन्यातली सोनोग्राफीसुद्धा तिथेच झाली—पूर्णपणे मोफत! माझं बाळंतपण कमला नेहरू हॉस्पिटलमध्ये झालं. पण बाळ जन्मल्यानंतर लगेचच त्याला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. कमला नेहरूमध्ये एनआयसीयू नव्हता, त्यामुळे डॉक्टरांनी आम्हाला वारजे येथील प्लॅटिनम हॉस्पिटलमध्ये पाठवलं. तिथे बाळाला 12 दिवस अ‍ॅडमिट करावं लागलं.

तो खर्च आम्हाला परवडणारा नव्हता. पण त्यावेळी आरोग्यसाथी रमाताईंनी 'महात्मा फुले जनआरोग्य योजने'बद्दल सांगितलं. या योजनेतून बाळाचा संपूर्ण उपचार मोफत झाला. त्या बारा दिवसातच आमचे 50 ते 60 हजार रुपये वाचले. बाळंतपण आणि बाळाची ट्रीटमेंट मिळून साधारण ऐंशी हजारांचा खर्च वाचला.

या सगळ्या काळात रमाताई माझ्यासोबत होत्या—सल्ला देत, धीर देत आणि गरज पडली की सोबत धाव घेत.

प्रियांका तांबारे
शौर्य तांबारे



# शुभांगी अहिरे

माझे पती कंत्राटी कामगार म्हणून एका कंपनीत काम करतात. मी सध्या सहा महिन्यांची गरोदर आहे. पहिलीच खेप असल्यामुळे घरात सगळे थोडे काळजीत होते, म्हणून सासूबाईंनी माझं नाव एका खासगी दवाखान्यात नोंदवलं. पण तिथे प्रत्येक भेटीला खर्च वाढत होता आणि मला मनातून अस्वस्थ वाटत होतं.

साथी संस्थेच्या रीनाताई वस्तीत मला भेटल्या. त्यांनी विचारलं, "इथेच महापालिकेच्या दवाखान्यात गरोदरपणाच्या सर्व तपासण्या आणि औषधं मोफत मिळतात, मग तिथून सेवा का घेत नाहीस?" त्यांच्या बोलण्यात आत्मविश्वास जाणवला. त्यांनी माझ्या सासूबाईंशीही शांतपणे चर्चा केली आणि त्यांनाही समजावून सांगितलं की सरकारी दवाखाने विश्वासार्ह आहेत.

मग आम्ही लक्ष्मीनगरच्या महापालिकेच्या दवाखान्यात नावनोंदणी केली. आता मी तिथूनच सर्व तपासण्या, औषधं आणि आवश्यक सेवा घेते—संपूर्णपणे मोफत.

आज मला जाणवलं की योग्य मार्गदर्शन मिळालं की निर्णय घेणं सोपं होतं. गरोदरपणासारख्या काळात ही खात्री—की उपचार वेळेवर आणि मोफत मिळतील—यापेक्षा दुसरं मोठं समाधान नाही.

**शुभांगी अहिरे**



# कस्तुरी पवार

मी गेल्या पंचवीस वर्षांपासून संभानगर वस्तीत राहते. आमच्या वस्तीत बहुतेक पारधी समाजाचे लोक आहेत. आधीच्या काळात इथल्या महिलांची परिस्थिती खूपच वेगळी होती. गरोदरपणात त्या दवाखान्यात जात नसत—ना तपासणीसाठी, ना सल्ल्यासाठी. बाळंतपण बहुधा घरीच व्हायचं किंवा काहीजणी ससून रुग्णालयात जात. तीन वर्षांपूर्वी तर आमच्या वस्तीत एका महिलेचा बाळंतपणात मृत्यू झाला होता. त्या दिवसानंतर मला कायम वाटायचं—आपल्या इथं काहीतरी बदल घडवायला हवा.

महिलांना गरोदरपणातील तपासण्या, सोनोग्राफी, लसीकरण याबद्दल माहितीच नव्हती. बाळांना लस दिल्यानंतर ताप येतो, म्हणून त्या लसीकरणच टाळायच्या.

मग साथी संस्थेच्या रीनाताई आमच्या वस्तीत येऊ लागल्या. त्या घराघरात जाऊन समजावून सांगायच्या—तपासणी का आवश्यक आहे, लसीकरणाचं महत्त्व काय आहे आणि वेळेवर उपचार घेतले तर किती त्रास टळू शकतो. हळूहळू वस्ती बदलते आहे.

आता मी माझ्या सगळ्या नातवंडांचं लसीकरण पूर्ण करून घेतलं आहे. आणि रीनाताईंच्या सांगण्यावरून मी स्वतः इतर महिलांनाही समजावते, त्यांना दवाखान्यात जायला, मुलाचं लसीकरण करायला प्रवृत्त करते.

**कस्तुरी पवार**



# जयश्री भूंबे

आमच्या वस्तीत एकदा साथी संस्थेमार्फत ‘गरोदर महिलांचे आरोग्य’ या विषयावर कार्यक्रम झाला होता. त्यावेळी माझी बहिण त्या कार्यक्रमाला गेली होती. ती परत आली तेव्हा तिच्याकडे आरोग्याविषयी काही पुस्तिका होत्या. मी त्या वाचल्या आणि त्यानंतर माझा दृष्टिकोनच बदलला. तेव्हापासून मी साथी संस्थेशी जोडले गेले.

मी नंतर ‘मॉम मिनिस्टर’, ‘पोषणाची सापशिडी’, ‘पोषण आहाराची ओटी’ अशा अनेक कार्यक्रमांमध्ये सहभागी झाले. या सगळ्यांमुळे गरोदरपणात स्वतःची काळजी घेणं, आहाराचं महत्त्व आणि सकारात्मक विचार ठेवणं याबद्दल मला खूप शिकायला मिळालं.

गरोदरपणात मी माझं नाव पृथक बराटे दवाखान्यात नोंदवलं आणि सगळी तपासणी व उपचार तिथूनच घेतले. बाळंतपण सुतार रुग्णालयात झालं—सगळं मोफत! कोणताही खर्च न होता. खूप चांगला अनुभव होता. सरकारी दवाखान्यात उपचार घेतल्यामुळे आमचे तीस-पस्तीस हजार रुपये वाचले.

माझं माहेर रामनगरमध्ये आहे. गरोदरपणात मी इथेच राहायला आले. साथी संस्थेकडून मिळालेल्या माहिती आणि साहित्याचा उपयोग करून मी माझ्या आहारात बदल केले, स्वतःची काळजी घेतली.

जयश्री भूंबे
तृष्णा भूंबे



# उमा भोरपकर

साथी संस्थेने रामनगरमध्ये काम सुरू केलं, तेव्हापासून मी त्यांच्या कामाशी जोडली गेले. मी वस्तीत अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करते, त्यामुळे इथल्या गरोदर महिलांची आणि लेकरांची परिस्थिती मला आधीपासूनच माहीत होती. साथी संस्थेचं काम जवळून पाहिलं, तेव्हा जाणवलं—ते केवळ माहिती देत नाहीत, तर प्रत्येक व्यक्तीशी नातं जोडतात.

आरोग्यसाथी वस्तीतल्या प्रत्येक घरात जातात, महिलांशी बोलतात, त्यांच्या कुटुंबातील लोकांशी संवाद साधतात. त्या फक्त उपचारांबद्दल सांगत नाहीत, तर लोकांचा आरोग्यावर होणारा अनावश्यक खर्च कसा टाळता येईल, यासाठीही प्रयत्न करतात. त्यांच्या कामातून लोकांमध्ये विश्वास निर्माण झाला आहे.

माझ्याही आयुष्यात त्यांच्या कामाचा थेट फायदा झाला. आरोग्यसाथींनी मला विविध सरकारी आरोग्य योजनांबद्दल माहिती दिली. त्यामुळे माझ्या मिस्टरांच्या आजारपणाच्या काळात उपचार योग्य वेळेवर मिळाले आणि आम्ही मोठा खर्च वाचवू शकलो.

**उमा भोरपकर**
अंगणवाडी मदतनीस



# प्रणिता देडे

आमचं कष्टकरी कुटुंब. मी शिवणकाम करते आणि माझे पती वॉचमन आहेत. साथी संस्थेचं काम आमच्या वस्तीत सुरू झालं तेव्हापासूनच मी त्यांच्याशी जोडले गेले—माझ्या पहिल्या गरोदरपणापासून. आता मी दुसऱ्यांदा गरोदर आहे.

गरोदरपणात माझं रक्त कमी होतं आणि त्यासाठी काय करावं हे मला कळत नव्हतं. तेव्हा आरोग्यसाथी रीनाताई मला भेटल्या. त्यांनी समजावून सांगितलं—काय खावं, काय टाळावं आणि आहारात थोडे छोटे बदल करूनही आरोग्य कसं सुधारू शकतं. त्यांच्या सल्ल्याने मी माझं खाणं-पिणं बदललं आणि हळूहळू माझं हिमोग्लोबिन वाढलं.

आता मी आणि माझ्या सासूबाई दोघीही साथीच्या बैठकींना नियमित जातो. रीनाताई माझ्या पहिल्या मुलाचं नियमित वजन घेतात, त्याचं वजन वाढतं आहे की नाही हे सांगतात. त्यामुळे मुलाच्या तब्येतीकडे नेहमी लक्ष दिलं जातं.

आज मी स्वतः महिला आरोग्य समितीची सदस्य आहे आणि वस्तीत इतर महिलांना मदत करते. साथी संस्थेचे उपक्रम आता माझ्या आयुष्याचा एक भाग झाले आहेत.

**प्रणिता देडे**

सदस्य, महिला आरोग्य समिती, कोथरूड



# वैष्णवी कुलथे

मी जेव्हा गोकुळपठारला नव्याने राहायला आले, तेव्हा इथे अंगणवाडीच नव्हती. त्यामुळे माझ्या बाळाचं नियमित वजन घेणं, लसीकरण आणि अंगणवाडीतून मिळणारा पोषक आहार—या सगळ्याविषयी मला काहीच माहिती नव्हती. बाळ लहान होतं आणि मी सतत काळजीत असायचे—त्याची वाढ नीट आहे का? त्याला पुरेसं अन्न मिळतंय का? हेच समजत नव्हतं.

साथी संस्थेच्या सुधाताईंनी मला खूप मदत केली. त्यांनी माझ्या बाळाचं नियमित वजन घेतलं आणि त्याच्या वाढीबद्दल मला माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, 'माझ्या बाळालाही अंगणवाडीच्या सेवांचा फायदा मिळू शकतो'. मग त्यांनी स्वतः विठ्ठलनगरच्या अंगणवाडीताईंशी चर्चा करून माझ्या बाळाचं नाव तिथे नोंदवलं.

बाळ सहा महिन्यांचं झाल्यावर सुधाताईंनी त्याच्या आहाराविषयी योग्य मार्गदर्शन केलं—काय खायला द्यावं, किती वेळानं द्यावं आणि कोणतं अन्न त्याच्यासाठी महत्त्वाचं आहे हे त्यांनी सांगितलं.

तेव्हापासून मी साथी संस्थेशी जोडली गेले आहे.

वैष्णवी कुलथे
धीरज कुलथे



# सुलोचना शिवले,
# निर्मला चव्हाण

“

साथी संस्थेच्या वैशालीताई आम्हाला नेहमी मदत करतात. आम्ही अंगणवाडीत काम करतो आणि आमच्या केंद्रातील मुलांची वजनं घेण्यासाठी त्यांच्याकडील वजनकाटा त्या नेहमी उपलब्ध करून देतात. गरज पडली की स्वतः येऊन मदत करतात.

आमच्या वस्तीमध्ये माता आणि बाल आरोग्य, तसेच पोषणाशी संबंधित अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम, आम्ही वैशालीताईंसोबत मिळून राबवतो. कधी ‘पोषण सापशिडी’, कधी ‘पोषणाची ओटी’, तर कधी आरोग्यविषयक खेळ आणि चर्चा सत्र—या सगळ्यांमुळे वस्तीतील महिलांचा आणि पालकांचा सहभाग खूप वाढला आहे.

आधी लोक आरोग्यविषयक कार्यक्रमांकडे दुर्लक्ष करायचे, पण आता ते स्वतःहून येतात, प्रश्न विचारतात आणि काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करतात.

**सुलोचना शिवले**
अंगणवाडी सेविका

**निर्मला चव्हाण**
अंगणवाडी मदतनीस



# पूजा जगदेव

मी गोसावी वस्तीची रहिवासी. मिस्टर रिक्षा चालवतात. गेली तीन वर्षं मी साथी संस्थेशी जोडलेली आहे. दुसऱ्यांदा गरोदर राहिले तेव्हा आरोग्यसाथी कल्पनाताईंनी गरोदरपणात काय काळजी घ्यावी, कोणत्या तपासण्या आणि उपचार आवश्यक आहेत, याबद्दल सविस्तर समजावलं. त्यांच्या सल्ल्याने मी बिंदू माधव ठाकरे दवाखान्यातून सर्व तपासण्या आणि उपचार घेतले.

बाळ सहा महिन्यांचं झालं तेव्हा त्याचं वजन फक्त सहा किलो होतं. डॉक्टरांनी सांगितलं की तो 'मध्यम कमी वजनात' आहे. मी काळजीत पडले, पण कल्पनाताईंनी शांतपणे मार्गदर्शन केलं—त्या म्हणाल्या, की बाळाच्या आहारात थोडे छोटे पण महत्त्वाचे बदल कर. त्यांच्या सल्ल्यानुसार मी बाळाला घट्ट डाळ, अंडं, थोडं कच्चं तेल आणि तेलबियांची पावडर द्यायला सुरुवात केली.

हळूहळू फरक दिसू लागला—आता माझ्या बाळाचं वजन नऊ किलो झालं आहे. मी घरातच त्याच्यासाठी एक छोटा 'बाळकोपरा' तयार केला आहे, जिथे तो खाऊ शकतो आणि सुरक्षितपणे खेळतो. मजेशीर गोष्ट म्हणजे या सगळ्या बदलांचा परिणाम माझ्या मोठ्या मुलावरही झाला—त्याचं वजन आणि भूक दोन्ही वाढली आहे.

पूजा जगदेव
त्र्यंबक जगदेव



# स्नेहा शिंदे

मी गरोदर असताना उषाताई माझ्या आयुष्यात आल्या आणि खरंच सगळं बदललं. त्यांनी सुरुवातीपासून माझं नाव महापालिकेच्या पृथक बराटे दवाखान्यात नोंदवलं आणि सगळ्या तपासण्या व उपचार तिथून मिळावेत यासाठी मदत केली. त्या वेळोवेळी माझी चौकशी करायच्या, सल्ला द्यायच्या आणि प्रत्येक टप्प्यावर माझ्या सोबत राहायच्या.

माझी सोनोग्राफी सुतार दवाखान्यात झाली—ती पूर्णपणे मोफत होती. बाळंतपण कमला नेहरू रुग्णालयात झालं. पण एक अडचण होती—माझं नाव सर्वेक्षण यादीत नसल्याने मला अंगणवाडीतून सेवा मिळत नव्हत्या. मी चिंतेत होते, कारण बाळासाठी पोषण आणि माहिती दोन्हींची गरज होती.

तेव्हा उषाताई पुन्हा पुढे आल्या. त्यांनी जवळच्या दुसऱ्या अंगणवाडीताईंशी बोलून माझं नाव नोंदवलं आणि मला त्या सर्व सेवा मिळवून दिल्या—पोषण आहार, सल्ला आणि बाळाचं नियमित वजन घेणं. त्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे मी निश्चिंत झाले.

**स्नेहा शिंदे**
**ध्रुव शिंदे**



# पूजा गायकवाड

आम्ही हातावर पोट असलेले लोक आहोत. मिस्टर पेंटिंगचं काम करतात. मी घरीच असते कारण माझी दोन्ही मुलं अजून लहान आहेत. गरोदरपणाच्या काळात मी सर्व उपचार महापालिकेच्या दवाखान्यात घेतले आणि माझं बाळंतपण सुतार रुग्णालयात सुरक्षितपणे पार पडलं.

माझा मुलगा वर्षाचा झाला तेव्हा त्याचं वजन कमी होतं; तो 'मध्यम कुपोषणात' गेला होता. तेव्हा साथी संस्थेच्या पूजाताई मला नेहमी भेटायच्या. त्यांनी समजावून सांगितलं — बाळाला काय खायला द्यावं, कसं द्यावं आणि घरच्या आहारातून पोषण कसं मिळवता येईल. त्यांच्या सल्ल्याने मी बाळाच्या आहारात बदल केले — घरचं अन्न, अंडी, दूध आणि थोडं जास्त लक्ष. पूजाताई नियमित येऊन त्याचं वजन आणि उंची तपासत आणि मला मार्गदर्शन करत राहिल्या.

हळूहळू बदल दिसू लागला — माझा आदिनाथ आता कुपोषणातून बाहेर आला आहे. त्याचं आरोग्य सुधारलं आहे आणि चेहऱ्यावर हसू परत आलं आहे. मला वाटतं, जर मी खासगी दवाखान्यात गेले असते, तर दहा-पंधरा हजार रुपये खर्च झाले असते. पण साथी संस्थेमुळे हे सगळं मोफत झालं आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे — माझं बाळ आज सुदृढ आहे.

**पूजा गायकवाड**
**आदिनाथ गायकवाड**



# नीलम ओव्हाळ

हे माझं दुसरं गरोदरपण. सध्या सातवा महिना सुरू आहे. गरोदरपणाच्या सुरुवातीला मला फारशी माहिती नव्हती—कुठे तपासण्या करायच्या, काय काळजी घ्यायची, हे सगळं गोंधळाचं वाटत होतं.

तेव्हाच आरोग्यसाथी पूजाताईंनी माझी भेट घेतली. त्यांनी मला समजावलं की सरकारी दवाखान्यांमधून सर्व सेवा मोफत मिळतात आणि तिथे उत्तम डॉक्टरही असतात. त्यांच्या सल्ल्यानुसार मी पृथक बराटे दवाखान्यात जायला सुरुवात केली.

पहिल्यांदा तपासणी केली तेव्हा माझं हिमोग्लोबिन फक्त 7.9 होतं. डॉक्टरांनी सांगितलं की, 'ते खूप कमी आहे आणि मला आयर्न सुक्रोज इंजेक्शन घ्यावं लागेल'. पूजाताईंच्या मार्गदर्शनाने मी कमला नेहरू रुग्णालयात गेले. तिथे मला पाच इंजेक्शनचे डोस मिळाले—आता माझं हिमोग्लोबिन 12.5 वर पोहोचलं आहे.

पुढील तपासण्या आणि सेवांसाठीही पूजाताई सतत मदत करत आहेत. पूजाताईंचा सततचा पाठपुरावा आणि हसरा चेहरा, म्हणजे मला भेटलेली नवीन मैत्रीण.

**निलम ओव्हाळ**



# छाया गायकवाड

मी घरकामगार आहे. रोजचं आयुष्य काम, घर आणि मुलांभोवती फिरतं, पण साथी संस्थेमुळे माझ्या घराच्या ओट्यावर एक वेगळीच गजबज दिसते. आमच्या वस्तीतल्या महिला—गरोदर, स्तनदा आणि तरुण आया—सगळ्या या बैठकींना येतात.

या बैठका माझ्या घरासमोर होतात आणि त्यासाठी महिलांना बोलावणं, बसण्यासाठी चटया टाकणं, सगळ्यांना चहा पाजणं—हे सगळं मीच करते. आणि मला त्यात खूप आनंद मिळतो. कारण या भेटीत आम्ही फक्त ऐकत नाही, तर एकमेकांचे अनुभवही शेअर करतो.

साथी संस्थेच्या कल्पनाताई घरोघरी जाऊन महिलांना समजावतात. गरोदरपणात काय काळजी घ्यावी, बाळाचं खाणं कसं असावं आणि सरकारी योजना कशा मिळू शकतात. त्यांच्या बोलण्यात आत्मीयता आहे, म्हणून लोक त्यांचं ऐकतात.

मला वाटतं, अशा मार्गदर्शनाची आपल्या वस्तीतील बायांना खूप गरज आहे. कारण माहिती मिळाली की बाया आत्मविश्वासाने वागायला लागतात. आणि हेच खरं—आपल्या बाया शहाण्या झाल्या की सगळी वस्तीच पुढं जाते.

**छाया गायकवाड**



# मोनाली शिंदे

मी गोकुळपठारला नवीन राहायला आले तेव्हा मी गरोदर होते. त्या काळात सगळं काही नवीन होतं – परिसर, लोक आणि आरोग्यसेवा कुठे मिळते हे सुद्धा माहिती नव्हतं. तेव्हाच साथी संस्थेच्या सुधाताई माझ्या संपर्कात आल्या त्यांना कसं कळलं माहीत नाही पण त्यांनी माझा सगळा गोंधळ दूर केला.

सुधाताईंनी मला समजावलं की सरकारी दवाखान्यातून गरोदरपणाच्या सर्व सेवा मोफत मिळतात. त्यांनी स्वतः माझ्या नोंदणीसाठी मदत केली आणि तपासणी, औषधं आणि इतर सेवा कशा घ्यायच्या हे सविस्तर सांगितलं. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सगळं नीट पार पडलं.

मी साथी संस्थेच्या अनेक कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होते. संस्थेतर्फे झालेल्या 'पोषक आहार प्रात्यक्षिक स्पर्धेत' मी भाग घेतला आणि पहिलं बक्षीस मिळवलं – तो दिवस आजही आठवतो. सुधाताई अजूनही माझ्या मुलीचं नियमित वजन घेतात आणि तिच्या वाढीबाबत मला वेळोवेळी सांगतात. त्यांच्या रूपाने मला एक मैत्रीण मिळाली.

**मोनाली शिंदे**
श्रीजा शिंदे



# मालती शर्मा

मी लक्ष्मीनगरमध्ये राहते आणि शिवणकाम करते. साथी संस्थेने आमच्या वस्तीत काम सुरू केलं, तेव्हापासून मी त्यांच्या प्रत्येक बैठकीला नियमितपणे जाते. त्या बैठका माझ्यासाठी केवळ माहिती घेण्याचं ठिकाण नाहीत—तर एकमेकांकडून शिकण्याचं आणि बदल घडवण्याचं माध्यम आहेत.

वस्तीतील इतर महिलाही या बैठकींना याव्यात म्हणून मी सगळ्यांना नेहमी बोलावते. काहींना वाटतं की 'हे आपल्यासाठी नाही', पण मी त्यांना समजावते—आरोग्याविषयी माहिती मिळाली की आपलं आयुष्यच सुधारतं.

बैठकींपलीकडेही मी सक्रिय राहते. वस्तीतील समस्या – पाणी, स्वच्छता, आरोग्यसेवा – या अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी मी पुढाकार घेते. चर्चांमध्ये सहभागी होते आणि प्रश्न सोडवण्यासाठी पाठपुरावा करते.

आता मी महिला आरोग्य समितीची सदस्य आहे आणि साथी संस्थेकडून होणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेते. माझ्यासाठी हा केवळ सहभाग नाही—तर आपल्या वस्तीच्या महिलांसाठी काहीतरी करण्याची जबाबदारी आहे.

**मालती शर्मा**
महिला आरोग्य समिती सदस्य
कोथरूड



# दिपाली नंदगिरी

मी गेल्या पंचवीस वर्षांपासून संभानगरमध्ये राहते. आमच्या वस्तीतले बहुतेक लोक पारधी भटके समाजातील आहेत — लिंबू-मिरची विकणारे, सिग्नलवर फिरून रोजचा उदरनिर्वाह करणारे. दिवसाचा बहुतेक वेळ रस्त्यावर जातो आणि मिळालेल्या पैशात घर कसं चालवायचं, हाच मोठा प्रश्न असतो. अशा परिस्थितीत आरोग्य आणि पोषण यांसारखे विषय फार मागे पडतात.

पण साथी संस्थेने आमच्या वस्तीत काम सुरू केल्यापासून वातावरण बदललं आहे. आरोग्यसाथी नियमित भेटी घेतात, महिलांशी बोलतात आणि गरोदरपणातील काळजी, तपासण्या आणि मुलांच्या लसीकरणाचं महत्त्व समजावून सांगतात. हळूहळू वस्तीतल्या बायका स्वतःहून दवाखान्यात जायला लागल्या आहेत आणि लसीकरणाला मुलांना घेऊन येतात.

आधी ज्या बायका 'कुपोषण म्हणजे काय' हेच समजत नव्हत्या, त्या आता स्वतः पुढाकार घेऊन मुलांच्या आहारात बदल करत आहेत. आमच्या वस्तीतली महिला आरोग्य समितीही आता सक्रियपणे काम करते.

**दिपाली नंदगिरी**
अध्यक्ष, महिला आरोग्य समिती सदस्य
कर्वेनगर

# साथीच्या **‘माता व बाल आरोग्य व पोषण सुधार’** कार्यक्रमाच्या माध्यमातून घडलेले बदल

## गेल्या तीन वर्षांच्या काळात प्रकल्पाअंतर्गत 1185 महिलांसोबत झालेल्या कामाचा परिणाम

**630** महिलांना त्यांच्या गरोदरपणातील नाव नोंदणी पासून ते सरकारी दवाखान्यांमध्ये बाळंतपणासाठी मदत.

**332** महिलांची मोफत सोनोग्राफी करण्यात मदत. या मध्ये महिलांचे **रु.511050** वाचवले.

**392** महिलांची महापालिका, सरकारी दवाखान्यात मोफत बाळंतपण आणि इतर उपचारांमध्ये मदत. या प्रक्रियेमध्ये शहरी वस्त्यांमधील अनेक कुटुंबाचे **रु.8441000** वाचवले.

---

## गेल्या वर्षभरात कुपोषणाचा प्रश्न हाताळून बालकांच्या कुपोषण श्रेणीमध्ये घडवलेले बदल आणि त्याचे परिणाम

1. **612** मुलांचा नियमित पाठपुरावा केला.
2. प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात नॉर्मल श्रेणीतील मुलांची टक्केवारी **84%** होती जी आता **91%** पर्यंत वाढवली.
3. प्रकल्पाच्या सुरुवातीला मध्यम कुपोषणात असलेल्या मुलांचे प्रमाण **10%** होते, जे प्रमाण आता **7.2** पर्यंत कमी झाले.
4. प्रकल्पाच्या सुरुवातीला तीव्र कुपोषणात असलेल्या मुलांचे प्रमाण **5%** होते ते आता **1.8%** पर्यंत कमी करण्यात यश मिळाले.
5. प्रकल्पाच्या सुरुवातीला मध्यम कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण **19.8%** होते ते आता **7%** पर्यंत कमी करण्यात यश आले.
6. तीव्र कमी वजनाच्या मुलांचे प्रमाण **7%** होते ते आता **3%** पर्यंत कमी करण्यात यश आले.

एकूण कुपोषण श्रेणीमध्ये असलेल्या **149** मुलांचा नियमित पाठपुरावा, त्यांच्या वजन-उंचीनुसार मोजमाप आणि पालकांचे समुपदेशन, नियमित पाठपुरावा, आहार प्रात्यक्षिके अशा विविध हस्तक्षेपामुळे **10** महिन्यांमध्ये **80** बालके कुपोषणमुक्त झाली आहेत.

# साथी बद्दल थोडेसे

## साथी -अनुसंधान ट्रस्टचे कृती-संसाधन केंद्र

- सोप्या भाषेत चित्रमय पद्धतीने आरोग्यसेवेची आणि आरोग्य विषयी माहिती वेगवेगळ्या स्वरूपात (पोस्टर, पत्रक, पुस्तिका, फ्लेक्स, व्हिडीओ) प्रकाशित करणे.
- सार्वजनिक आरोग्य सेवेच्या लोकांप्रती उत्तरदायित्वासाठी काम.
- हक्काधारित दृष्टीकोनातून काम करणाऱ्या महाराष्ट्रातील ग्रामीण, आदिवासी भागातील संस्था-संघटनासोबत आरोग्य हक्कांवर काम करणारी सहयोगी संस्था.
- आरोग्य, आरोग्यसेवा आणि सामाजिक क्षेत्रातील प्रश्न राजकीय पातळीवर महत्त्वाचे मुद्दे म्हणून उभे करण्यासाठी सतत प्रयत्नरत.
- सार्वजनिक आरोग्यसेवा बळकट करण्यासाठी धोरणात्मक पातळीवर कार्यरत.
- आरोग्यसेवांच्या लोक सहभागी विकेंद्रित नियोजन आणि अंकेक्षण यासाठी कार्यरत.
- पोषण हक्कासाठी लोकाधारित काम करणे.
- आरोग्य व पोषण मुद्यांवर संशोधन आणि विश्लेषण.
- महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन कायदा 2021 अंतर्गत खासगी हॉस्पिटलमधील रुग्ण हक्काच्या तरतुदींची जनजागृती.

# या प्रकल्पाच्या शिलेदार



**प्रकाशक**
अनुसंधान ट्रस्ट-साथी
(Support for Advocacy & Training to Health Initiatives)
अमन-ई टेरेस, प्लॉट नं. 140, दहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे - 411038
फोन : (020) 25473565, 25472325
**E-mail :** sathicehat@gmail.com
**Website :** www.sathicehat.org

Supported By
BAJAJ FINSERV